# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.01.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दिल्लीत 12 हजार 200 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी.

- अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हन  दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर.

- प्रयागराज इथं होणाऱ्या महाकुंभमेळयासाठी रेल्वेतर्फे तेरा हजार गाड्या सोडण्यात  येणार.

- ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर राजगोपाल चिदंबरम यांचं काल पहाटे मुंबईत प्रदीर्घ आजारानं निधन.

आणि

- सिडनी क्रिकेट कसोटीत ऑस्ट्रेलियाला विजयासाठी 162 धावांचं आव्हान.

मोदी-दिल्ली-विकास प्रकल्प

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दिल्लीत 12 हजार 200 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात  येणार आहे. दिल्ली-गाझियाबाद-मेरठ नमो भारत कॉरिडॉरच्या साहिबाबाद आणि न्यू अशोक नगर दरम्यान 4 हजार 600 कोटी रुपयांच्या 13 किलोमीटरच्या पट्ट्याचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते आज होणार आहे.याशिवाय,6 हजार 230 कोटी रुपये किमतीच्या दिल्ली मेट्रोच्या चौथ्या टप्प्याच्या रिठाला-कुंडली विभागाची पायाभरणी

पंतप्रधानांच्या हस्ते होईल.तसंच नवी दिल्लीतल्या केंद्रीय आयुर्वेद संशोधन संस्थेच्या नवीन अत्याधुनिक इमारतीची पायाभरणीही आज पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

**मोदी-ग्रामीण भारत**

ग्रामीण भारताचा विकास झाला तरच आपलं विकसित भारताचं स्वप्न पूर्ण होईल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत केलं. ग्रामीण भारत महोत्सवाचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते झालं त्यावेळी मोदी यांनी ग्रामीण भारत हा विकास आणि संधीचं केंद्र व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. खेड्यापाड्यात राहणाऱ्या भारतीयांना सन्मानाचं जीवन जगता यावं हा प्रयत्न सरकार करत असल्याचं ते म्हणाले. आदिवासी विकासासाठी प्रधानमंत्री जनमन योजना सुरू करण्यात आली आहे, दारिद्र्य रेषेबाहेर आलेल्या 25 कोटी नागरिकांपैकी बहुतांश नागरिक ग्रामीण भागातले असल्याचं त्यांनी नमूद केलं. भारत मंडपम इथं सुरू झालेला ग्रामीण भारत महोत्सव हा भारताच्या ग्रामीण भागातली कला आणि संस्कृती यांचं दर्शन घडवणारा 6 दिवसांचा सोहळा आहे. उद्योजकतेतून महिला सक्षमीकरण यावर महोत्सवात भर देण्यात आला असून ईशान्य भारतावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आलं आहे.

**अमेरिका सुरक्षा सल्लागार**

अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हन आज दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यादरम्यान ते राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल,परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि अन्य भारतीय नेत्यांचीही भेट घेतील.दिल्लीतल्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेलाही ते भेट देणार असून तिथं युवा भारतीय उद्योजकांशी ते संवाद साधतील.

**रेल्वे कुंभमेळा**

प्रयागराज इथं होणाऱ्या आगामी महाकुंभमेळयानिमित्त यात्रेकरूंच्या सोयीसाठी रेल्वे तर्फे तेरा हजार (13,000) गाड्या चालवण्यात येणार आहेत.महाकुंभमेळयाच्या आधी आणि नंतरच्या 2-3 दिवसांसह या रेल्वेगाड्या 50 दिवस चालवल्या जातील. प्रयागराजमधील गंगा, यमुना आणि सरस्वती नद्यांच्या संगमावर येत्या 13 जानेवारी ते 26 फेब्रुवारी या कालावधीत हा महाकुंभमेळा होणार असून सुमारे 40 कोटी भाविकांची गर्दी होण्याची अपेक्षा आहे. प्रवाशांचा गोंधळ आणि गर्दी टाळण्यासाठी संबंधित स्थानकावर जाण्यापूर्वी प्रवाशांना 'यात्री-केंद्रा'कडं पाठवण्यात येईल,जेणेकरून गर्दी व्यवस्थापन योग्य प्रकारे होऊ शकेल,असं उत्तर मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी शशिकांत त्रिपाठी यांनी सांगितलं आहे.

**केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी**

देशात सौर ऊर्जा निर्मिती क्षेत्रात 90 गिगावॅट क्षमतेची क्षमता असून त्याला चालना देण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील, असं मत केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी व्यक्त केलं,त्यांनी काल मध्य प्रदेशमधल्या खंडवा जिल्ह्यातील ओंकारेश्वर तरंगत्या सौर प्रकल्पाची पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते.ओंकारेश्वर तरंगता सौर प्रकल्प हा मध्य प्रदेशातील पहिला आणि देशातील सर्वात मोठ्या तरंगत्या सौर प्रकल्पांपैकी एक अनोखा प्रकल्प असून त्याची देशातल्या अन्य ठिकाणीही पुनरावृत्ती होऊ शकते, असं सांगत 2030 पर्यंत 500 गिगावॅट आणि 2047 पर्यंत 1800 गिगावॅट वीज निर्मितीचं केंद्र सरकारचे लक्ष्य असल्याची माहिती जोशी यांनी यावेळी दिली.

**तेलंगणा-कृषीयोजना**

तेलंगणाचे मुख्यमंत्री ए रेवंत रेड्डी यांनी रायथू भरोसा योजनेंतर्गत शेतजमिनीसाठी प्रति एकर 12 हजार रुपये देण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय जाहीर केला आहे. शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या 10 हजार रुपयांच्या मदतीमध्ये ही वाढ करण्यात आली आहे. इंदिरम्मा आत्मीय भरोसा योजना या प्रस्तावित योजनेअंतर्गत भूमिहीन शेतकरी कुटुंबांना प्रतिवर्ष 12 हजार रुपये देण्याची घोषणाही त्यांनी केली. 2023 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी, काँग्रेस पक्षानं रयथू भरोसा योजनेंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येणारी आर्थिक मदत वाढवण्याचं आणि भूमिहीन शेतमजुरांना आर्थिक सहाय्य देण्याचं आश्वासन दिलं होतं.या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महसूल अधिकारी सर्व पंचायतींमध्ये ग्रामसभा आयोजित करतील आणि लोकांना कोणती जमीन रयथू भरोसा योजनेसाठी पात्र आहे आणि कोणती नाही याबद्दल सविस्तर माहिती देतील,असंही मुख्यमंत्री रेड्डी यांनी काल सांगितलं. या योजनांची अंमलबजावणी येत्या 26 जानेवारीला प्रजासत्ताक दिनापासून करण्यात येणार आहे.

**प्रकाशपर्व**

बिहारमधील पाटणा शहरातील तख्त श्री हरमंदिर साहिब इथं शीख समुदायाचे 10 वे आणि शेवटचे शीख गुरू गुरु गोविंद सिंगजी यांच्या 358 व्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय प्रकाश उत्सव सोहळ्याला काल सुरुवात झाली. तख्त श्री हरमंदिर साहिब हे गुरु गोविंद सिंगजी यांचं जन्मस्थान आहे. यानिमित्तानं आज भव्य नगर कीर्तन अर्थात मिरवणूक काढण्यात येणार असून त्याची सांगता तख्त श्री हरमंदिर साहिब इथं होणार आहे. प्रकाश पर्वचा मुख्य सोहळा उद्या मध्यरात्री गुरु ग्रंथसाहिबच्या पवित्र श्लोकांचे पठण आणि फटाक्यांच्या आतषबाजीत साजरा केला जाणार आहे. या प्रकाशपर्व सोहळ्याला देश-विदेशातील भाविक मोठ्या संख्येनं उपस्थित आहेत.

**वरुण-भारत-फ्रान्स**

भारत आणि फ्रान्स यांच्यातील वरुण या संयुक्त नौदल सरावात सहभागी होण्यासाठी फ्रेंच नौदलाची अणुऊर्जेवर चालणारी विमानवाहू नौका चार्ल्स डी गॉल काल गोव्यात दाखल झाली. गोव्याच्या मुरगाव पोर्ट ट्रस्ट जेट्टीवर काल या विमानवाहू नौकेचं आगमन झाल्यावर भारतीय नौदलाच्या वाद्यपथकानं औपचारिक स्वागत केलं.दरम्यान राफेल सागरी लढाऊ विमानाचा समावेश असलेला फ्रेंच वाहक स्ट्राइक गट भारतीय नौदलाच्या जहाजांसह 42 व्या वार्षिक द्विपक्षीय नौदल सरावात सहभागी होणार आहे. भारत आणि फ्रान्सच्या नौदलांमधील आंतरकार्यक्षमता वाढवणे, परस्पर समज वाढवणे आणि संबंध मजबूत करणे हा या सरावाचा उद्देश आहे. हिंदी महासागर क्षेत्रात सागरी सुरक्षेसाठी योगदान देण्यासाठी फ्रान्स आणि भारत नियमितपणे परस्पर सहकार्य करत आहेत.

**लष्करदिन**

लष्कर दिनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील पुण्यात आयोजित Know Your Army मेळाव्यामध्ये केंद्रीय संचार ब्यूरोचं, सैन्य विषयक माहिती देणारं एक दालन उभारण्यात आलं आहे. या बहुमाध्यम प्रदर्शनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी भेट दिली. भारतीय लष्कराशी संबंधित छायाचित्र आणि माहिती देणारं हे प्रदर्शन आज सकाळी 9 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुलं असणार आहे.

**धुके दिल्ली**

धुक्याच्या दाट थरामुळे आज सकाळी दिल्लीत विमान उड्डाण आणि रेल्वे सेवा विस्कळीत झाली आहे. धुक्यामुळे दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर अनेक विमानांना उशीर होत आहे. अनेक रेल्वेगाड्या उशिराने धावत आहेत.

**चिदंबरम-निधन**

देशाच्या अणुऊर्जा क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान देणारे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर राजगोपाल चिदंबरम यांचं काल पहाटे मुंबईत प्रदीर्घ आजारानं निधन झालं. ते 88 वर्षांचे होते. भारताला अण्वस्त्र सज्ज देश बनवण्यामध्ये चिदंबरम यांचा मोलाचा वाटा होता. देशातल्या दोन्ही अणू चाचण्यांमध्ये त्यांचा मोठा सहभाग होता. केंद्र सरकारचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार, भाभा अणु संशोधन केंद्राचे संचालक, अणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष यासारख्या अनेक जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या. चिदंबरम यांना पद्मश्री आणि पद्मविभूषण पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉक्टर चिदंबरम यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

क्रिकेट

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या बॉर्डर – गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेतील पाचव्या आणि अंतिम सामन्यात भारताचा दुसरा डाव 157 धावांवर संपुष्टात आला. ऑस्ट्रेलियापुढे जिंकण्यासाठी 162 धावांचे आव्हान ठेवण्यात आलं आहे. ऑस्ट्रेलियाकडून स्कॉट बोलँड याने सर्वाधिक 6 बळी घेतले. भारताने कालच्या 6 बाद 129 धावांवरून आपला डाव सुरू केल्यानंतर भारताने केवळ 28 धावांची भर घातली. शेवटचं वृत्त हाती आलं तेंव्हा ऑस्ट्रेलियाच्या 4 बाद 143 धावा झाल्या होत्या.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**